महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!
एक महिना - २४९९/- रु.
तीन महिने - ५९९९/- रु.
सहा महिने - ९९९९/- रु.
✻ संपादक ✻
मो. क्र. ९५४५९१०१७७/८९९९९२१९९४

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - ०८ ■ बुधवार दि. ०९ जुलै २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

# चाळीसगाव तालुक्यात ८ गावांमध्ये फेरफार सरपंच पदाचे आरक्षण; महिला राज कायम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे चाळीसगाव प्रतिनिधी:- चाळीसगाव तालुक्यातील ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण काल✻ दिनांक ८ जुलै मंगळवार रोजी नवीन प्रशासकी इमारतीत असलेले तहसील कार्यालयात तहसीलदार व प्रांतधिकारी यांनी नुकतीच लहान मुलीच्या साह्याने सोडतीद्वारे जाहीर केले आहे. या नवीन आरक्षणामुळे काही प्रस्तापितांना जोरदार धक्का बसला आहे. तर पुढाऱ्यांची गोची झाली आहे, तर काहींना सोईचे सरपंच पदाचे आरक्षण निघाले असल्याने, मनाच्या मनात मांडे खात आहे. तर काही ठिकाणी कभी खुशी कभी गम अशी अवस्था झाली आहे.

चाळीसगाव तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींच्या अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग सरपंच पदाचे आरक्षण निश्चीत करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मागास प्रवर्गाला (ओबीसी ) २७ टक्के आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार प्रांताधिकारी प्रमोद हिले व तहसीलदार प्रशांत आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोडत सभा दुपारी ठीक २ वाजता घेण्यात आली. लहान बालकाच्या हातून चिठ्या काढून ,निश्चीत केलेल्या सरपंच पदामधून अनु. जाती महिला, अनु. जमाती महिला, नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला यांचे सरपंच पद थेट निवडणुकीने सोडतीने निश्चीत करण्याकरीता उपविभागीय अधिकारी प्रमोद हिले यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २ वाजता सभा घेण्यात आली. त्यानुसार सरपंच पदाच्या सन २०२५-२०३० या कालावधीसाठी आरक्षण सोडत निश्चीत करण्यात आले. तालुक्यातील ११० ग्रामपंचायतीपैकी तब्बल ५६ ग्रामपंचायतींच्या खूर्चीवर महिला राज येणार असून आहे. पुन्हा एखादा नारी शक्तीच्या हाती गावचा कारभार येणार आहे., तरी महिला सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीमुळे झेरॉक्स सरपंच पदाला ऊत येणार आहे. आणि इतर ठिकाणी सरपंच पदाचे आरक्षण आपल्या मना सारखे न घडल्याने अनेक गावातील मातब्बर प्रस्थपितांचे स्वप्न भंगले आहे.

सर्वोच न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसीसाठी २७ टक्के आरक्षणाला मान्यता दिली आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यात काढण्यात आलेले सरपंच पदाचे आरक्षण रद्द करण्यात येवून पुन्हा नव्याने हे आरक्षण आज मंगळवार ८ जुलै रोजी काढण्यात आले. एप्रिल महिन्यात काढण्यात आलेल्या आरक्षणात फारसा बदल झाला नाही. ७ गावांमध्ये मात्र उलटफेर झाला आहे. त्यामुळे किरकोळ अपवाद वगळता सरपंच पदाचे आरक्षण तेच राहीले आहे. तब्बल ५६ गावांमध्ये सरपंच पद महिलांसाठी निश्चीत करण्यात आले आहे.

चाळीसगाव तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींच्या अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग सरपंच पदाचे आरक्षण निश्चीत कराण्यासाठी प्रांताधिकारी प्रमोद हिले तहसीलदार प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोडत सभा सकाळी वाजता घेण्यात आली. अभिज्ञा विरेंद्र पाटील या सहा वर्षांच्या बालिकेच्या हातून सरपंच पदाचे आरक्षण चिठ्या काढून, निश्चीत केलेल्या सरपंच पदामधून अनु. जाती महिला, अनु. जमाती महिला, नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला यांचे सरपंच पद थेट निवडणुकीने आरक्षण सोडतीने निश्चीत करण्याकरीता उपविभागीय अधिकारी प्रमोद हिले यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २ वाजता सभा घेण्यात आली. त्यानुसार सरपंच पदाच्या सन २०२५-२०३० या कालावधीसाठी आरक्षण सोडत निश्चीत करण्यात आले. तालुक्यातील ११० ग्रामपंचायतीपैकी तब्बल ५६ ग्रामपंचायतींच्या गावचा कारभार महिला राज हाकलणार राहणार आहे. गावगाडयाचे राजकारण हे सरपंच पदाचे आरक्षणामुळे बदलणार असल्यामुळे, नवीन आरक्षण हे गाव पुढाऱ्यांचे सरपंच पदाच्या आरक्षणाकडे तालुक्याचे लक्ष लागलेले होते.

तालुक्यातील ११० ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण याप्रमाणे असणार आहे.

✻अनुसुचीत जाती प्रवर्ग सरपंचपद महिला✻

-लोजे, दरेगाव, माळशेवगे, गणेशपूर,जुनोने, वडाळा वडाळी

✻पुरुष सरपंच पद✻ शिंदी,वलठाण, अंधारी, बाणगाव, बोरखेडा खुर्द, टाकळी प्र.चा.

✻अनुसुचीत जमाती प्रवर्ग महीला✻

खेरडे, डोणदिगर, खेडीखुर्द, तळोदे प्र.चा., पातोंडा, वाघाले, पिंप्री खुर्द, रांजणगाव, तांबोळे बुद्रक

✻अनुसूचित जमाती प्रवर्ग पुरुष सरपंचपद✻

आडगाव, रोकडे, पोहरे, टाकळी प्र.दे. वाघळी, सांगवी, भोरस बुद्रुक, बोरखेडा बुद्रुक

✻नागरीकांचा (ओबीसी) मागास प्रवर्ग महिला✻ सरपंचपद- दरकेबडी, ओझर, पिलखोड, जामठी प्र.ब.. बिलाखेड. देवळी, गोरखपूर, चिंचखेडे, हिंगोणे खुर्द, राजदेहरे, पिंपरखेड, सुंदरनगर, पिंपळगाव, पिंप्री बुटूक प्र.चा.. घोडेगाव,

✻नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष सरपंच पद✻

तळेगाव, खडकी बुदूक, कृष्णानगर, जामदा, नांदे, न्हावे, लोंढे, सायगाव, खेडगाव, कोदगाव, बेलदारवाडी, पाटणा, भऊर, ओढरे, वरखेडे बटुक

✻सर्वसाधारण महिला सरपंच पद✻- शिरसगाव, शिदवाडी, दहिवद, कुंकार, तरवाडे बुद्रुक पिंप्री बुद्रुक प्र.दे.. अलवाडी, करजगाव, मेहुणबारे, बहाळ, हिंगोणेसीम, हिरापूर, खरजई, रहीपूरी, रोहीणी, वाकडी, रामनगर, तामसवाडी, धामणगाव, सेवानगर, तळोंदे प्र.दे., चिचगव्हाण, मुंदखेडे खुर्द, तिरपोळे, आंबेहोळ, चांमाडी 'बुद्रुक

✻सर्वसाधारण पुरुष सरपंच पद✻-पिंपळवाड निकुंभ, हातले, चितेगाव, दसेगाव बुद्रक, चांभाड़ी खुर्द, पिंपळवाड म्हाळसा, खडरिसीम, उंबरखेड, उपखेड, भामरे बुद्रुक, ब्राम्हणशेवगे, हातगाव, देशमुखवाडी, पळासरे, तमगव्हाण, मांदुर्णे, वाघडू, डामरूण, विसापूर, भवाळी, मुंदखेडे बुद्रुक, बोवरे, वहगाव लांब, टेकवाडे खुर्द, कळमडू,

चाळीसगाव तालुक्यातील ११० ग्रामपंचायतीचे

सरपंच पदाचे आरक्षण सर्वसाधारण प्रवर्ग पुरुष-२५, सर्वसाधारण महिला-२६ नागरीकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी)-१४, नागरीकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) महिला-१५, अनुसुचीत जाती प्रवर्ग-६. अनुसुचीत जाती प्रवर्ग महिला-६, अनुसुचीत जमाती प्रवर्ग-८, अनुसुचीत जमाती महिला-९ या प्रमाणे सरपंच पदाचे आरक्षण निघाले आहे.




श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

✻ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून
**B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.**
प्रवेश पात्रता - १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




✻ वैशिष्टे ✻
✻ उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
✻ भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
✻ सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
✻ ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
✻ मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
✻ भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
✻ मर्यादित विद्यार्थी संख्या

**प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९**
पत्ता - कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.
✻ प्राचार्य :- मोबा. 9922172799

श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया
(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०) शैक्षणिक वर्ष २०२५-२६

**पदवी अभ्यासक्रम**

| | | |
|---|---|---|
| B.A.<br>(Bachelor of Arts Specialization)<br>B.A. Eniglish<br>B.A. Marathi<br>B.A. Hindi<br>B.A. History<br>B.A. Geography<br>B.A. Economice<br>B.A. Politics | B.Sc.<br>(Bachelor of Science Specialization)<br>B.Sc. Chemistry<br>B.Sc. Physics<br>B.Sc. Micro Biology<br>B.Sc. Botany<br>B.Sc. Zoology | B.Com.<br>(Bachlor of Commerce)<br>Business Administration<br>Marketing |

**प्रवेशासाठी खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असेल**
१) ॲडमिशन फॉर्म
२) मुळ कागदपत्र (Orignal L.C.) व दोन स्वयंसाक्षांकित प्रती
३) गुणपत्रकाच्या दोन स्वयंसाक्षांकित प्रती
४) जातीचा दाखला व दोन स्वंयसाक्षांकित प्रती (आवश्यक असल्यास)
५) आधार कार्ड दोन स्वयंसाक्षांकित प्रती
६) शिक्षणात खंड असेल तर गॅप सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा.

टिपः महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा. सदर कागदपत्र शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी आवश्यक आहे.

✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻
✻ प्राचार्य :- मोबा. 9922172799



# नांदगावच्या व्ही.जे. हायस्कूलमध्ये 'यशनिश्चित' दिन कार्यक्रम संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नांदगाव** – नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित व्ही.जे.हायस्कूल नांदगाव येथे मंगळवार दिनांक ८/७/२०२५ रोजी 'मनशक्ती' प्रयोग केंद्र लोणावळा आयोजित 'यशनिश्चित' दिन कार्यक्रम गुरुदक्षिणा सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

'मनशक्ती' प्रयोग केंद्र ही एक सामाजिक कार्य करणारी 'विज्ञान निष्ठ' संस्था आहे. विद्यार्थीनी तणावमुक्त अभ्यासातून यशप्राप्ती कशी करावी..? ह्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

ह्या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून अकादमी बोर्ड अध्यक्ष मा.डॉ. सारंग इंगळे ,माजी मुख्या . श्रीम.मीनाक्षी गोळे, अध्यक्ष संकुल प्रमुख मा.श्री.संजीव धामणे, मनशक्ती केंद्राचे साधक मा.श्री. विनय पटवे, मा.श्री.जयवंत रावळे, सौ. जयश्री रावळे, सौ.मृणाल इंगळे शाळेचे मुख्या .श्री.लक्ष्मीकांत ठाकरे ,उपमुख्या . श्री.मिलिंद श्रीवास्तव, कार्यक्रम प्रमुख



व अकादमी बोर्ड सदस्य सौ. रुपाली झोडगेकर आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती देवतेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. मान्यवरांचा परिचय सौ. रुपाली झोडगेकर ह्यांनी करून दिला. उपस्थित मान्यवराचे शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्या . श्री.मिलिंद श्रीवास्तव ह्यांनी केले. विद्यार्थांना तणावमुक्त अभ्यासातून यश प्राप्ती कशी करावी तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधला जाईल..? हा हेतू समोर ठेवून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला पहिल्या सत्रात सकाळ सत्रातील विद्यार्थासाठी ,दुसऱ्या सत्रात शिक्षकांसाठी व तिसऱ्या सत्रात दुपारील विद्यार्थासाठी कार्यक्रम घेण्यात आला.

पहिल्या सत्रात इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थांना प्रत्यक्षात मा.श्री. विनय पटवे यांनी मार्गदर्शनास सुरवात केली. ह्यात कमी वेळेत जास्त अभ्यास कशा प्रकारे करावा ..? अभ्यासाची जागा,वेळ,दिशा,आपल्या मेंदूचे कार्य हे विज्ञानाच्या आधारे विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना अभ्यास,आदर व इच्छा ह्या गोष्टींसाठी आपण वैज्ञानिक दृष्टीकोनातून आपले शरीर व मन कशा प्रकारे तयार करायचे..? ह्याचे मार्गदर्शन केले.

इयत्ता ८ वी च्या विद्यार्थांना सौ.मृणाल इंगळे,व सौ.जयश्री रावळे यांनी वर्गात जाऊन विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात शिक्षकांची मनशक्ती यात 'पिढी घडविणारे शिक्षक' ह्या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. सौ.रुपाली झोडगेकर ह्यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. मा.डॉ. सारंग इंगळे ह्यांनी 'पिढी घडविणारे शिक्षक' ह्या विषयावर मार्गदर्शन केले. ह्यात आजच्या शिक्षकांना विविध प्रकारे मनावर ताण असतो.., त्यातून त्या शिक्षकांचे आरोग्य ही बिघडते ह्यातून बाहेर पडण्यासाठी शिक्षकांचे मनशक्तीचा वापर करून आपली पिढी कशी चांगली होईल..? ह्याविषयी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर निसर्गाच्या नियमाने वागून आपले आरोग्य कसे चांगले होईल त्यासाठी आपला आहार, व्यायाम, उपवास, शरीरासाठी लागणारे पाणी ह्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले तथा शिक्षकाच्या शंकाचे छान पद्धतीने निरसन केले.शेवटी मा.मुख्या . लक्ष्मीकांत ठाकरे यांनी मागर्दर्शना बद्दल आभार मानले ह्या कार्यक्रमाचा सर्व विद्यार्थी व शिक्षकांना नक्कीच फायदा होईल..; ह्यांसह सर्व शिक्षकांच्या मनशक्ती व आरोग्य ह्या दोनही बाबीत निश्चितपणे बदल होतील..; अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम.निवेदीता सांगळे ह्यांनी केले. कार्यक्रमासाठी टी.एम. सदस्य श्री.गुलाब पाटील ,श्री.भास्कर मधे आदींसह शाळे-तील सर्व पदाधिकारी ,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते यांचे मोलाचे सहकारे लाभले.

# नेताजी सुभाषचंद्र बोस गुरूकुलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शरद लोहकरे, लासलगाव – आषाढी एकादशीच्या निमित्ताने नेताजी सुभाषचंद्र बोस गुरूकुलमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या निमित्ताने विविध अभंग, हरिपाठ सादर केले.

विद्यार्थ्यांनी भजन, कीर्तन आणि प्रवचन सादर केले. एकादशी म्हणजे पक्षातील अकरावा दिवस ,पश्चिम भारतात विष्णूचा अवतार असलेल्या विठ्ठलाची सेवा संपूर्ण महाराष्ट्र करतो व ही संस्कृती आपण जपणार आहोत असा बोध डॉक्टर प्रतापराव पवार यांनी केला. कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे श्री अरुण नेहरकर यांनी त्याला सुरत भजन अभंग सादर करून दिंडीला साथ दिली.

विद्यार्थ्यांनी पारंपारिक पोशाख परिधान केले आणि भजनांमध्ये आपली आवाजाची जादू दाखवली. पारंपारिक दिंडी, पालखी, भजन, रिंगण आणि रिंगणाला प्रदक्षिणा घालणारा घोडा या



सर्व गोष्टींनी वातावरण भक्तीमय झाले होते .शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली रिंगणात उभे राहून नृत्य सादर केले व पालखीची शोभा वाढवली. विद्यार्थी तसेच प्रमुख पाहुणे व शिक्षक यांनी फुगड्या घालून आपली परंपरा पुढे चालू ठेवण्याचा निर्धार केला. या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आषाढी एकादशीचे महत्त्व आणि पारंपारिक संस्कृतीबद्दल अधिक समज निर्माण झाली. जागतिक वनमहोत्सव आठवडा साजरा करत मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. गुरुकुलची परंपरा जपत यज्ञ करण्यात आला. सर्व विद्यार्थी शिक्षक यांनी मिळून पसायदान म्हटले व कार्यक्रमाची सांगता झाली.

गुरूकुलच्या शिक्षकांनी या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांना आषाढी एकादशीच्या महत्त्वाबद्दल माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना या सणाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व विशद केले. सौ नीलिमा हिंगमिरे व सौ गायत्री खांडेकर यांनी एकादशीनिमित्त अभंग व महत्त्व थोडक्यात समजावले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोल-ाचे योगदान कार्यक्रमाला लाभले.

# मका पिकावर अळीच्या प्रभाव नियंत्रणासाठी औषधे फवारणी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : येथील परिसरात सध्या लष्करी या अळी-चे प्रमाण वाढत असल्याने शेतकऱ्यांनी औषधे फवारणीस सुरूवात केली आहे. त्याचा प्रसार दिवसेंदिवस वेगाने होत आहे.ही अळी पोग्यात अंडी घालून मका पिकाची पाने कुरतडत असते. यामुळे पिकाची वाढ खुंटत जाऊन मोठी हानी होते.पीकाची विरळ होऊन उत्प-ादन घटते. अद्याप मका बियाणे आणि खतांवरील पैसा तेवढाच तणनाशक आणि लष्करी अळीवर पैसा खर्च करण्याची वेळ गेल्या दहा वर्षांपासून शेतकऱ्यांवर येत आहे. दरवर्षी पेक्षा यावर्षी मे महिन्यापासून सतत पाऊस सुरू असल्याने मका पिकातील मोठ-



मोठे तण पोसु लागले आहे.तर अळीचा प्रादुर्भाव देखील मोठ्या प्रमाणात वाढू लागला आहे.

महागाची खते,बियाणे,मजुरी सहन करत खरीप हंगामातील मका पिकावर या रोगाचे आक्रमण झाल्याने पुन्हा फवारणीसाठीचा खर्च वाढला असल्याने शेतकऱ्यांना औषधे फवारणी करण्यासाठी महागड्या किंमतींचे औषधे खरेदीसाठी मोठी झळ सहन करावी लागत आहे.

# हजारो भाविकांच्या उपस्थितीत मुंजवाड ते बेज वारी संपन्न



**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ, सटाणा प्रतिनिधी:-

सालाबादप्रमाणे यंदाही श्री क्षेत्र मुंजवाड ते बेज वारी सो-हळा मोठ्या आनंदात हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. वारीचे हे पाचवे वर्ष होते ह्या वारीचे वैशिष्ट म्हणजे संत तुकाराम महाराज यांच्या पालखीच्या रथा सारखा रथ ह्या सोहळ्यात श्रीगोंदा हून बनविण्यात आला आहे हा रथ ओढण्यासाठी चार मानाच्या बैलजोड्या होत्या एक स्वतः रामदास बाबा ट्रस्ट ची राजू बाबा यांची बैलजोडी दुसरी मुंजवाड येथील शेतकरी वसंत पंडित तिसरी शुभम राऊत दिंडोरी आणि चौथी भगवान त्र्यंबक वळवडे येथील होती ह्या वारी चे पिंपलदर मांग बारी मधील दृश्य हे नयनरम्य असते. घाट परिसर आजूबाजूने डोंगर झाडी आणि पावसाच्या सरी जणू पालखी दिव्य घरातूनच जात आहे असा भास यावेळी होतो. वारीत सगळ्यात महत्वाचे म्हणजे शिस्त पहायला मिळते सगळे भाविक दोन दोन च्या जोड्या करून रत्याने एका साईड ने चालतात जेणे करून दुसऱ्या प्रवाश्यांना त्यांची अडचण होत नाही. वारीच्या मागून वारकऱ्यांचे एक स्वतंत्र पथक कचरा उचलत असते वारी मुळे निसर्गाचा ऱ्हास होणार नाही कचरा होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जाते. शिस्त आणि स्वच्छता म्हणून ह्या वारीची नाशिक जिल्ह्यात एक स्वतंत्र ओळख तयार झाली आहे. मोठया मोठ्या र्धीर्ढीलश्‍ी ला तसेच गायक मंडळी ना ह्या वारी ने भुरळ घातली असून बऱ्याच नामवंत चेनल चा लोकांनी ह्या वारीत सहभाग नोंदवला आहे. वारीचे पिंपळदर खमखेडा भादवन नवी बेज ह्या गावात जल्लोषात स्वागत केले जाते .यंदा जुनी बेज इथला रिंगण सोहळा ह्या वारीचा प्रमुख आकर्षण ठरला आहे. रिंगण सोहळ्या नंतर जुनी बेज इथिल पुरातन विठ्ल रखुमाई इथील मंदिरात आरती करून आणि परमपूज्य रामदास बाबा यांच्या पादुका असलेली पालखी भेटवून वारीचा शेवट केला जातो.ज्या भाविक भक्तांना पंढरपूर च्या वारीत जाणं शक्य होत नाही सोहळा अनुभवता येत नाही त्या भाविकांनी वारीत सहभागी व्हा रामदास बाबा ट्रस्ट आयोजित निर्मल वारीत सहभागी व्हा असे आवाहन श्री राजू बाबा सुर्यवंशी यांनी यावेळी केले.

# सीईटी कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या प्रवेश नोंदणीला मुदतवाढ

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता बी.ई./बी.टेक आणि एमबीए/एमएमएस यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी तीन दिवस मुदतवाढ आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी विविध आरक्षण प्रवर्गांतून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ईडब्ल्युएस/एनसीएल/सीव्हीसी/टीव्हीसी (EWS/NCL/CVC/TVC) बाबतची मूळ प्रमाणपत्रे अंतिम प्रवेश प्रक्रियेच्या दिनांकापर्यंत सादर करण्याची सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. या निर्णयामुळे अनेक उमेदवारांना आपला प्रवेश घेण्यासाठी वेळ मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी अधिक माहितीसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळाला नियमित भेट द्यावी, असे आवाहनही मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# मांजरपाडा देवसाने प्रकल्प प्रवाहीत झाल्याने येवलेकरांना पोहोच कालव्याच्या पाण्याची प्रतिक्षा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : येवला तालुक्याच्या उत्तर पूर्व भागाला सततच्या दुष्काळाचा शाप असलेल्या भागाला मांजरपाडा (देवसाने) पुणेगाव-दरसवाडी-डोंगरगाव पोहोच कालव्याला येणाऱ्या ओव्हर फ्लो पाण्याने दुर होनार असुन ह्या धरणाच्या पाण्याच्या प्रतीक्षेत येवला तालुक्यातील उत्तर पूर्व भागातील शेतकरी बसला असून येवला तालुक्यात आज पर्यंतच्या पावसात नुस्ती पिके जंगली पण बंधारे मात्र कोरडी आहे . जिल्ह्यातील व देवसाने भागात धरणांच्या पाणीपातळीत होत



असलेली वाढ येवला तालुका ,चांदवड तालुक्याच्या दुष्काळी भागाला पाणी उपलब्ध होणार ह्या आशेने शेतकरी बसला आहे. मांजरपाडा( देवसाने) भागात होत असलेला धुवाधार पाऊसाने नद्या दुथडी भरून वात आहे त्यामुळे या धरणाचे पाणी पुणेगाव धरणात पोहोचली असले तरी या धरणाला उनंदा नदी तूनही देखील मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत असल्याने पुणे गाव धरण ७५ टक्के च्या पुढे भरले असल्याने थोड्या दिवसात चांदवड येवल्यासाठी पाणी मिळणार या आशेने शेतकरी बसले आहे मागील वर्षी पुणे-गाव- दरसवाडी -डोंगरगाव पोहोच कालव्याच्या पाटाणे पाणी वाहिले थेट डोंगरगावच्या बंधाऱ्यात पडले परंतु कालव्याचे काम अपूर्ण असल्याने पाठीमागे मोठ्या प्रमाणात जिरले, पाणी बंद झाले पण येवल्याचे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक मंत्री माननीय छगनरावजी भुजबळ यांनी मागील वर्षी पाठचारीचे अपूर्ण असलेले काम जवळपास पूर्ण केले असून आता हे पाणी येवल्याच्या दिशेने प्रभावित होईल या आशेने शेतकरी डोळा लावून बसलाय जर चालू वर्षी पर्जन्यमान असाच असला तर येवला व चांदवड भागातील दुष्काळी गावांना असलेले बंधारे , तलाव ,नालाबंडीग,पाझर आशा या भागातील दुष्काळी तलाव व नद्या वरील लहान शेतकऱ्यांना वाटत आहे. मोठे बंधारे निश्चित भरती अशी

**//पुणेगाव ते दरसवाडी ६३ किमी आणि दरसवाडी ते डोंगरगाव ८७ किमी हे कॉंक्रिटीकरण चे मुख्य काम किरकोळ अपवाद वगळता पूर्ण झालेले आहे. पाणी प्रवाहात कुठेही अडचण नाही. आरक्षित असलेल्या बंधाऱ्यावर गेट बसविने चे काम बाकी आहे. नदीवरून पाटाचे पाणी जात असलेल्या ठिकाणी पायी चालण्यासाठी समांतर पूल, त्याचप्रमाणे कालव्याच्या एकाबाजूकडून दुसरीकडे जाण्यासाठीचे पुलाचे काही ठिकाणचे कामे सुरू आहेत. सगळे कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना नामदार छगन भुजबळ यांनी प्रशासनाला दिलेले आहेत.**
**डॉ मोहन शेलार पाणी आंदोलक //**

**//या कालव्याच्या संपर्कात आमच्यासारख्यांच्या शेत जमीन असून पाण्याची गरज आहे . तरी या कालीवाला पाणी येणे नितांत गरजेचे आहे .पण जशे मागील वर्षी निवडणुकीच्या तोंडावर कालव्याला जलपुजना पुरते पाणी आले आणि बंद झाले. असे नको व्हायला**
**सुभाष निकम- अध्यक्ष येवला लासलगाव विधानसभा राष्ट्रवादी शरद पवार गट//**

# 'स्त्री और समय पुस्तक' व 'दुनिया मेरी उडान देखेगी' चित्रपटाचा पोस्टर प्रकाशन सोहळा नाशिकमध्ये संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक - समाजात दुर्दैवाने अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या हुंडा बळी या सामाजिक समस्येमुळे अनेक निरपराध, संवेदनशील विवाहिता बळी पडत आहेत, यावर भाष्य टाकणाऱ्या मीनाक्षी निर्मला लिखित स्त्री और समय या आशयघन नाटकावरील पुस्तकाचा आणि दुनिया मेरी उडान देखेगी या हिंदी चित्रपटाच्या पोस्टरचा प्रकाशन सोहळा सोमवार दिनांक ७ जुलै २०२५ रोजी नाशिक येथील महाकवी कालिदास कला मंदिर सभागृहात सायंकाळी ४.००




वा. आयोजित करण्यात आला आहे.

मीनाक्षी निर्मला, जीतू शिंदे यांच्या सोबत मेसर्स पद्मश्री बिल्डर्स पराग अहिरे, प्रमुख पाहुणे म्हणून कल्किराम महाराज, दिलीप दळवी, जयराज नायर, पराग अहिरे, गणेश जाधव, निखिल पवार, या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

लेखिका मिनाक्षी निर्मला यांच्या स्त्री और समय या नाटकावरील पुस्तकाला विजया जीवन यांची प्रस्तावना आहे. एका सधन कुटुंबातील अतिशय संवेदनशील ममता या विवाहितेचा तिच्या सासरच्यांकडून तिने आपल्या माहेराहून जमीन व भरपूर पैसे वगैरे आणावे यासाठी छळ केला जात असतो. तिचा पती केशव या प्रकरणात हतबल असतो. तिचा भाऊ रघु आपल्या या दुर्दैवी बहिणीला साथ देतो. समाजातील हुंडा बळी समस्या एक सामाजिक गुन्हा असून त्याला चहूबाजूने प्रतिकार करणे आवश्यक आहे हेच स्त्री और समय या कलाकृतीतून अतिशय प्रभावीपणे सांगण्यात आले आहे. या पुस्तकाचे प्रकाशक पुणे येथील संवेदना प्रकाशन आहे.

# धनादेश न वटल्याने एकास सहा महिने कारावासाची शिक्षा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी - येवला तालुक्यातील नगरसुल येथिल संत जनार्दन स्वामी नागरी सह.पतसंस्थेला कर्ज वसुलीसाठी दिलेला धनादेश न वटल्याने एकास सहा महिने कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. येथिल विजय रामदास पैठणकर यांनी संत जनार्दन स्वामी नागरी सहकारी पतसंस्थेकडुन सन २०११ मध्ये कर्ज घेतलेले होते.त्यांनी सदर पतसंस्थेच्या कर्जाची रक्कम नियमाप्रमाणे व कबुल केलेप्रमाणे फेड केली नाही. तगादा केला असता कर्जाचे बाकी रकमेपोटी व रक्कम फेडी करीता धनादेश दिला होता. सदरचा धनादेश न वठता परत आल्याने पतसंस्थेने येवले येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात फौजदारी खटला दाखल केला होता. सदर खटल्याचा दि. ५ जुलै २०२५ रोजी न्यायनिर्णय होवुन न्यायालयाने विजय रामदास पैठणकर यांना सहा महिन्याचा साधा कारावासाची शिक्षा ठोठावली असुन धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट कर्ज नुकसान भरपाई म्हणुन फिर्यादी संस्थेस सहा महिन्याचे आत देण्या बाबत आदेश केला आहे. तसेच त्या प्रमणे रक्कम न दिलेस दोन महिने साध्या कारावासाची शिक्षा भोगण्या बाबत आदेश करण्यात आलेला आहे. फियीदी पतसंस्थेच्या वतीने ॲड. दत्तात्रय एस. चव्हाण यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. योगेश पाटील व ॲड. यश चव्हाण यांनी सहकार्य केले.

# वडझिरेमध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजना सप्ताह संपन्न







**दै. आवाज वृत्तसेवा...**

सिन्नर - प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत सिन्नर तालुक्यातील वडझिरे या गावी प्रधानमंत्री फसल बीमा सप्ताह साजरा करण्यात आला. सन २०२५/२६ करता नाशिक जिल्ह्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनीला काम मिळाले असून गावामध्ये प्रतिष्ठित शेतकरी व महिला बचत गट यांना पीक विमा मध्ये सहभागी करून घेण्याविषयी सविस्तर माहिती दिली व योजना समजून सांगितली. यात बाजरी मका सोयाबीन कांदा या पिकांची संरक्षित रक्कम व विमा हप्ता या संदर्भात संपूर्ण माहिती व सविस्तर चर्चा करण्यात आली. मार्गदर्शन करण्याकरिता कृषी विभागाचे उप कृषी अधिकारी रणजीत आंधळे तसेच भारतीय विमा कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी बाळासाहेब रायकर, सिन्नर तालुका प्रतिनिधी सुयोग वाजे व कृषी सहाय्यक अश्विनी भदाने मॅडम या ही उपस्थित होत्या या सर्वांनी शेतकऱ्यांना आपल्या पेरणी केलेल्या पिकाचे शंभर टक्के पिक विमा काढून घेण्याचे आव्हान केले आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या पिक विमा योजनेत सहभागी होऊन पावसामुळे होणाऱ्या अतिवृष्टी, गारपीट, व उत्पन्न कमी येणाऱ्या या घटकांमधून होणाऱ्या नुकसानी करिता संरक्षण मिळण्यासाठी पिक विमा हा खूप महत्त्वाचा भाग आहे. हे या बैठकीमध्ये सांगितले गेले. गावातून सरपंच सुनीता नागरे, ग्रा प सदस्य बाळासाहेब बोडके रामेश्वर बोडके, सुनील नागरे, छाया नागरे, कमलाबाई नागरे या महिला शेतकरी व शेतकरी उपस्थित होते.

# सुरेगावात वैकुंठ रथाचे लोकार्पण




**दै. आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी:- कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून आषाढी एकादशीच्या शुभ मुहर्तावर वैकुंठ रथाचेश्री.प.पु.महंत स्वामी गोवर्धनगिरीजी महाराज यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी वाल्मिक आप्पा कोळपे राष्ट्रवादी सेवा सेल अंबादास धनगर दिपक कदम दादासाहेब जगताप बाळासाहेब हाळनोर देवराज कदम राजेंद्र भंडारे एकनाथ सुपनर मच्छिंद्र हाळणोर व्यंकटेश बोलगमवार यशवंत निकम मोतीराम निकम विष्णू इंगळे संजय ढोणे दिलीप शेरमाळे युवराज बिडवे अन्वर शेख राजेंद्र मेहरखांव महेश निकम शरद मेहेरखांब राजेंद्र भवर सौ.सविता शेरमाळे सौ.ताराबाई गायकवाड, ग्रामपंचायत अधिकारी दिगंबर बनकर ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी ग्रामस्थ व्यापारी वर्ग यावेळी उपस्थित होते.

# सेंद्रिय शेतीच्या दिशेने एक पाऊल - कंपोस्ट खताचा बेड भरून ठेवला

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शाश्वत आणि विषमुक्त शेतीकडे वाटचाल करताना शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळणं ही काळाची गरज बनली आहे. याच ध्येयाने प्रेरित होऊन ब्राह्मणगाव चे (ता. कोपरगाव) भागिनाथ बाबासाहेब आसने यांनी आपल्या शेतात कंपोस्ट खताचा एक बेड तयार करून ठेवला आहे.

या कंपोस्ट बेडसाठी घरगुती ओला कचरा, शेणखत, पालापाचोळा, मकाची वाळलेली कुट्टी , शेतीतील टाकाऊ जैविक अवशेष आदी घटकांचा वापर करून एक सेंद्रिय खत निर्मिती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. योग्य ओल-ावा, वायुसंचार आणि वेळोवेळी ढवळून उपयुक्त बुरशीजन्य आणि जीवाणूजन्य क्रिया वाढवण्यावर भर दिला जात आहे.

या उपक्रमाचा उद्देश रासायनिक खतांवरील अवलंबन कमी करणे, जमिनीचा पोत सुधारणे आणि पीक उत्पादनाची गुणवत्ता वाढवणे हा आहे. अशा प्रकारचे कंपोस्ट खत मातीतील सेंद्रिय घटकांची भरपाई करत शाश्वत शेतीसाठी महत्त्वाचे योगदान देऊ शकते.

आपल्या शेतातच खत तयार केल्यास खर्चही कमी होतो आणि मातीही समृद्ध होते, असं मत श्री. आसने यांनी यावेळी व्यक्त केलं.

सेंद्रिय शेतीकडे शेतकऱ्यांची ही पावलं शे-तीला नवसंजीवनी देणारी ठरणार आहेत.



# आशाबाई सोनवणे यांचे निधन

**दै. आवाज वृत्तसेवा...**



पिंपरखेड- पिंपरखेड ता. नांदगाव येथील ग्रामपंचयातीच्या माजी सदस्या आशाबाई दौलत सोनवणे (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. पिंपरखेडचे सैनिक अमित राजेंद्र सोनवणे यांच्या आजी होत व नाना दौलत सोनवणे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात ३ मुले, ३ मुली व नातवंडे असा परिवार आहे.

# चांगले मार्गदर्शन, प्रेरणा व संस्कार देणारा प्रत्येक व्यक्ती आपला गुरू

प्राचीन काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील पौर्णिमासाजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे.त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसुन येते.गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान-सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे.कारण गुरू शिवाय ज्ञान नाहीही म्हण सत्य आहे.गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून चांगले विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासुन आपल्याला चांगल्याप्रकारची चालना,गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम,आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती चांगले आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे. आई-वडिल हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत.जो पर्यंत सुर्य-चंद्र-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत आई-वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे आणि राहील यात दुमत नाही.कारण आई-वडीलां समोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे.ज्याप्रमाणे संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते.आई मायेचे पांघरूण घालुन मुला-मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो. त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घटना घडली तर आपण आईग म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात.यामुळे आपले दु:ख कमी होते.त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण बापरे म्हणतो.यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो. अशाप्रकारे आई-वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे जगात दिसून येते. म्हणजेच या जगात जो आपले पालन-पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो. त्याचप्रमाणे आपण नेहमी पहातो की आई-वडीलांचा अपमान कोनीही सहन करीत नाही आणि करणार नाही. अशा परिस्थितीत मुलं-मुली तुटून पडतात.यात खरे गुरु-शिष्याचे नाते दिसून येते.म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू-शिष्याचे नाते म्हणजे आई-वडिलच. यात मोठा वाटा म्हणजे आई-वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन.यातुनच गुरू-शिष्याचा जन्म झाला.आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या अफाट सावलीत मुलांची जोपासना करते तर वडील याच वटवृक्षाचा पहारेकरी बनुन परिवाराचे जतन व संरक्षण करते.मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा-चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख-दु:खाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते.कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो.आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो. तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासुन मिळत असते.आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो.कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात.त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची अत्यंत आवश्यकता असते.कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते.त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पहातो की कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू-शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकल्या जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडुलकर, दारासिंग,खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद,निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा. गुरूच्या परीक्षेत जो-जो पास होतो. तीच शिष्यांकडून गुरू दक्षिणा असते. आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू-शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच. व्दापरयुग,सत्ययुग,कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते.याकरीता गुरूची आवश्यकता असने गरजेचे असते.राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू-शिष्याचे नाते दिसून येते.यातुन राजकीय पुढारी तयार होतात. आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला.त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवु शकतो. कारण क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले.त्यामुळे गुरू शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही. याकरीता कोणतेही क्षेत्र असो अनुभव,ज्ञान,माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते. म्हणुनच म्हटल्या जाते गुरू बिना ज्ञाण अधुरा. त्याचप्रमाणे आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी.आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी-देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो.कारण आपण केलेल्या कार्याला यश प्राप्त झाले पाहिजे.भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत,थोरमहात्मे होवुन गेले.याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो. त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विश्र्व गुरू म्हणुन संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे भारताला विश्र्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते. कारण जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे. म्हणजेच आज भारत विश्र्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते.ह्या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धर्माची जोपासना यामुळेच भारताला विश्र्व गुरू म्हणून संबोधल्या जाते.गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई-वडीलांच्या सेवेला,त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू-शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे.आताही भारतात गुरू शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती-पंथ यांचा एकत्रित पणा यामुळेच आपल्याला गुरु-शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.शिष्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्यांच्या पासून आपण प्रेरणा घेतो,त्याची अवहेलना कुठेही होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.यातच शिष्यांची महानता दिसून येईल.गुरू पौर्णिमेबद्दल एक गोष्ट सांगु इच्छितो की,परीवारापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही, वडिलांपेक्षा श्रेष्ठ सल्लागार नाही,आई पेक्षा श्रेष्ठ जग नाही,भावापेक्षा श्रेष्ठ भागीदार नाही,बहीनी पेक्षा श्रेष्ठ शुभचिंतक नाही,मित्राशिवाय आयुष्य नाही यात आपल्याला गुरूचा गोडवा कीती महान आहे ते आपल्याला स्पष्ट दिसून येते.म्हणजेच प्रत्येक परीवार गुरूची भुमिका आप-आपल्या परीने पार पाडत असते.त्याचप्रमाणे सर्वांनीच एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की गुरू-शिष्याच्या नात्याला कोणीही कलंकित करणार नाही याचीही काळजी सर्वांनीच घेणे गरजेचे आहे. कारण गुरू-शिष्याच्या नात्यानेच आपण घडतो आणि घडवितो, आपला परिवार घडते व यातुनच देश घडतो.आई माझा गुरु,आई कल्पतरू, सुखाचा सागरू,आई माझी प्रीतीचे माहेर, शांतीचे आगार, मांगल्याचे सार आई माझी.गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने मी सर्वांना विनंती करतो की देशातील वाढते प्रदुषण,ऑक्सिजनचे कमी होत असलेले प्रमाण आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे वाढणारा धोका रोखण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या परिसरात किंवा घरी वृक्षारोपण केले पाहिजे.ज्याच्या परिसरात जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावुन वृक्षारोपण करायला हवे.कारण वाढते प्रदुषण मानव, जिवजंतू, वन्यप्राणी यांच्यासाठी अत्यंत धोकादायक स्थितीत आहे.त्यामुळे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे व पृथ्वी मातेचे रक्षण केले पाहिजे.गुरूपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!



**रमेश लांजेवार (प्रदेश प्रवक्ता)**
**(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# पावसाळ्यातील बेडकांचा वाढला ....डराव डु

**दै. आवाज वृत्तसेवा...**

वर्षानुवर्ष चिडीचूप बसायचं आणि निवडणुका आल्या की तोंड बाहेर काढून एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी जीवाची आटापिटा करायची अशीच काहीशी परिस्थिती आमच्या अवतीभवती दिसत आहे.



ज्यांना गल्लीत कुत्र विचारत नाही ते दिल्ली चे स्वप्न बघत असतात.

स्वतःचा वाढ दिवसाच्या शुभेछ्याचे मोठमोठे बॅनर काय लावतात, सोशल मीडियावर पोस्ट काय करतात, चार पाच बेवडे बावडे सोबत घेऊन व्हाईटम व्हाईट ड्रेस परिधान करून शाईनिंग काय करतात.असे महाभाग जागोजागी बघायला मिळतात.

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांतिल ABCD सुद्धा माहित नसते ते लोकं मतदारांना भुलवण्यासाठी अक्कल पाजळत जनुकाय पावसाळ्यातील बेडका प्रमाणे डराव डु करत फिरत सुटलेले दिसतात असाच काही सा प्रकार सर्वत्र बघावयास मिळत असतो.

आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका जाहीर झाल्या या पार्श्वभूमीवर गुडघ्याला बाशिंग बांधुन नवरदेव तयारच आहे. निवडणूक लढवणे म्हणजे इमानदार वफादार आणि आशावादी लोकांची मते जिंकणे होय मतदारांच्या आशा आकांक्षा वर खरं उतरणे होय.

काही नेत्यांचे तेच ते चेहरे दिसतात अन् सत्ता तुन पैसा आणि पैसा तुन सत्ता मिळवून अमाप धन संपत्ती मिळवण्याचे स्वप्न पहातात.

खरोखरच ज्यांची सामाजिक राजकिय परिस्थिती सुधरविण्याची नियत असेल त्यांनीच निवडणुकीला उभे राहणे आवश्यक वाटते.

वास्तविक पाहता ज्या समाजात आम्ही जन्माला आलो त्या समाजाचं आमच्यावर अनंत असे उपकार आहेत आणि ते उपकार फेडणे म्हणजेच हाच माझा धर्म आणि हेच माझे कर्म आहे असे समजुन सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांतिल नेते पुढाऱ्यांनी त्याग आणि समर्पित भावनेने जनतेचे कामं केले पाहिजे. केवळ निवडणुका आल्या की पावसाळ्यातील बेडका प्रमाणे डराव डु करत फिरू नये तुर्तास एव्हढेच.

**विद्रोही पत्रकार सुरेश जगताप (उल्हासनगर)**
**सामाजिक व राजकीय विश्लेषक**

# कु. चेतना तिडके ची नियुक्ती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नागपूर (प्रतिनिधी) - कु.चेतना राजेंद्र तिडके यांची एन.एफ.एस.यु.,भारत सरकार या पदावर उपकुलसचिव नुकतीच पदी नियुक्ती झाली आहे. कुमारी चेतना राजेंद्र तिडके राहणार मनोरा,जिल्हा भंडारा या राष्ट्रीय न्यायालयिक विज्ञान विश्वविद्यालय,(नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटी) गृहमंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली येथे सहाय्यक कुलसचिव या पदावर कार्यरत होत्या.परंतु त्यांच्या कामाची शैली व गुणवत्ता पाहुन नुकतीच नागपूर येथे स्थापन झालेली नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटी,भारत सरकार,नागपूर येथे



कुमारी चेतना राजेंद्र तिडके रा.मनोरा, जि.भंडारा याना उपकुलसचिव या पदावर पदोन्नती देऊन मोठी कामगिरी भारत सरकारने त्यांच्यावर सोपविली आहे.

कु.चेतनाच्यायशाबद्दलजैन कलार समाज व महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेतर्फे अभिनंदन करण्यात आले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आलेल्या आहेत.

## पांडुरंगा ...

षड्रिपुचा भुंगा
करी कसा दंगा
डसतसे अंगा दिनरात

घेती पाप पंगा
जाळते पतंगा
शोधतो मी गंगा पापभंगा

तुझ्या दर्शनाला
लांब लांब रांगा

भेटू कुठे सांगा भगवंता

अगा पांडुरंगा
जाणता अभंगा
विसरलो व्यंगा काय
सांगू

प्रसन्न होई कसा
मला या भणंगा
रे चंद्रभागा गंगा दारी

आली
वारक-या संगा
जाई मी सत्संगा
अभंग व्यासंगा
जाणियले

शोधता तुजला
पाहीले अंतरंगा
घावला श्रीरंगा
मजपाशी

**आवाज वृत्तसेवा - हेमंत मुसरीफ, पुणे. मो. ९७३०३०६९९६**

**वाढदिवस शुभेच्छा, निवड/ नियुक्ती शुभेच्छा जाहिरात,**
**जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री,**
**उद्घाटन सोहळा जाहिरात**
**तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा**
**सवलतीच्या दरात**
*** संपर्क ***
**९५४५९ १०१७७/८९९९९ २१११४**